# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 78/2022 दिनांक : 23.02.2022

## 1)जबरी चोरी :–

**लिंबगाव :–**दिनांक 22.02.2022 रोजी चे दुपारी 16.16 वा. सुमारास, **निळा रोडवरील वैशालीताई पावडे यांचे पेट्रोल पंपावर मौजे निळा शिवार ता. जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात तीन आरोपीतांनी संगणमत करुन एका नविन काळया रंगाच्या नंबर नसलेल्या पल्सर मो.सा. वर वैशालीताई पावडे पेट्रोल पंपावर येवून गाडीत दोनशे रुपयाचे पेट्रोल टाक असे फिर्यादीस सांगीतले फिर्यादीने त्यांचे गाडीत पेट्रोल टाकले तेव्हा त्याचे पाठीमागे बसलेले दोन ईसम खाली उतरले व त्यापैकी एकाने फिर्यादीचा हात पिरगाळला व दुसऱ्या आरोपीने पिस्टल सारखे दिसणारे हत्याराचा धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी देवून त्याने फिर्यादीचे हातातील पेट्रोल विक्री केलेली रक्कम 8,000/– तसेच फिर्यादी जवळ उभा असलेला त्यांचा सहकारी मुंजाजी ज्ञानेश्वर कदम यांना पण पिस्टल सारखे दिसणारे हत्याराचा धाक दाखवुन त्याचे जवळील पेट्रोल विक्रीतुन जमलेल्या अंदाजे 13,000/– रुपये असे एकुण 21,000/– रुपये जबर दस्तीने काढुन घेतले व गाडीवर बसुन नांदेड रोडने पळुन गेले आहेत. वगैरे **फिर्यादी मारोती प्रभाकर काळे, वय 22 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. सुनेगाव ता. वसमत जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 21/2022 कलम 394,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री पवार**, **मो.क्र. 9823288457** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 20.02.2022 रोजी चे 17.00 ते 22.00 वा. चे दरम्यान, **वाघाळेकर पेट्रोल पंपाचे बाजुला धनेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे राज टायर दुकानाचे शेटर तोडुन, वाकवुन कोणीतरी अज्ञात आरोपीने आत प्रवेश करुन वाहनाचे टायर किंमती 2,82,660/–रुपयाचा माल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी हनमंतराव लक्ष्मणराव आगळे, वय 57 वर्षे व्यवसाय व्यापार रा. आनंदनगर सन्मीत्रनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 103/2022 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री गणेश होळकर**, **मो.क्रं. 8888098010** हे करीत आहेत.

**2)सिंदखेड :–**दिनांक 21.02.2022 रोजी चे 23.00 ते दिनांक 22.02.2022 रोची चे 06.00 वा. चे दरम्यान, **मौजे सावरखेड येथील फिर्यादीच्या घरी ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व फिर्यादीचे आई वडील घराला कुलूप लावून आजोबाचे अत्यंविधीसाठी गावी गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने आत प्रवेश करुन घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने व रोख रक्कम असा एकुण किंमती 1,55,924/–रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी गणेश शिवाजी सुर्यवंशी, वय 22 वर्षे व्यवसाय शिक्षण रा. सावखेड ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 20/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री भोपळे**, **मो.क्रं. 9423926150** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**कंधार :–**दिनांक 21.02.2022 रोजी चे 07.50 वा. पुर्वी वेळ नक्की नाही, **सहयाद्री धाबा फुलवळ समोर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे ताब्यातील तुरीने भरलेली 306 पोते असलेली ट्रक नमुद ठिकाणी उभी करुन गावी नावंध्याची वाडी येथे गेला असता कोणीतरी अज्ञात आरोपीने ट्रक मधील 15 क्विंटल तुर किंमत अंदाजे 97,500/– रुपयाची चोरुन नेली वगैरे. **फिर्यादी श्याम विठ्ठल गायकवाड वय 30 वर्षे, व्यवसाय ट्रक चालक रा. नावंध्याची वाडी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 54/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2425 राठोड, मो. क्र. 9011736889** हे करीत आहेत.

## 4)खुनाचा प्रयत्न :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 22.02.2022 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरी दत्तनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे वडील मुलीच्या सासरी दत्तनगर,नांदेड येथे मुलीस नांदवुन घ्या म्हणुन मुलीस घेवुन गेले असता यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस फिनेल नावाचे औषध जिवंत मारण्याच्या उद्देशाने पाजवुन फिर्यादीच्या वडीलास मारहाण केली. वगैरे **फिर्यादी आश्विनी रामेश्वर दहीफळे, वय 25 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. दत्तनगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 73/2022 कलम 307,323,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री सोनकांबळे, मो. नं. 9588685155** हे करीत आहेत.

# 5)पळवुन नेले :—

**अर्धापुर :—** दिनांक 21.02.2022 रोजी सकाळी 06.00 वा. 18.00 वा. दरम्यान, **फिर्यादीचे घरुन मौजे धामदरी ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व सोबत संजय मारोती मस्के असे दोघे शेतात कामाला गेले व काम करुन घरी परत आल्यावर त्यांना त्यांची **मुले नामे 1) शिवम अर्जुन कदम वय 12 वर्ष (1) रोहन संजय मस्के वय 14 वर्षे दोघे रा. धामदरी ता. अर्धापुर,** हे दोघे घरी न दिसल्याने नातेवाईक व आजु बाजुला शोध घेतला असता दोन्ही मुले मिळुन आले नाहीत, त्यांना कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी अर्जुन गोविंदराव कदम, वय 46 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. धामदरी ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 47/2022 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री सुरवसे**, **मो.क्र. 9766105366** हे करीत आहेत.

# 6)अपघात :—

**1)शिवाजीनगर :—** दिनांक 13.02.2022 रोजी 22.30 वा. ते 22.50 वा. चे दरम्यान, **मनपा रोड रमामाता आंबेडकरनगर, नांदेड येथे,** यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल वर **मयत नामे आकाश मधुकर भुजबळ वय 22 वर्षे रा. रमामाता आंबेडकर नगर,नांदेड** या पाठीमागे बसवुन मोटार सायकल हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन पाठीमागे बसलेला मयत खाली पडुन डोक्यास गंभीर दुखापत होवून मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी संगीताबाई मधुकर भुजबळ वय 42 वर्षे व्यवसाय मजुरी रा. रमामाता आंबेडकरनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं. 71/2022 कलम 279,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री दवकत्ते, मो.क्र. 8975761232** हे करीत आहेत.

**2)भोकर :—** दिनांक 21.02.2022 रोजी 17.45 वा. चे सुमारास, **भोकर ते किनवट जाणारे रोडवरील सोमठाणा शिवारातील रोडवर चटलावार यांचे धाब्यासमोर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील आरोपीने त्याचे ताब्यातील टेम्पो क्रं. एम.एच./04—एएल—9955 ही हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन फिर्यादी हा त्याची भाची नामे पुजा हिच्या लग्न मंडपाची पुजा करण्यासाठी जारीकोट येथून भाचीचा पती नागेश व इतर सदस्यांना घेवून मॅक्झीमो क्रं. एम.एच./29—एआर—3219 ने साखरा या गावी जात असताना नमुद ठिकाणी टेम्पो चालक याने रॉगसाईड येवून फिर्यादी जात असलेले वाहन मॅक्झीमो ला समोरुन जोराची धडक दिली यात **1) पुजा ज्ञानेश्वर पामलवाड वय 21 वर्षे, 2) दत्ता ज्ञानेश्वर पामलवाड वय 22 वर्षे, 3) पपडया उर्फ संतोष परमेश्वर पामलवाड तीघे रा. साखरा ता. उमरखेड जि. यवतमाळ, 4) माधव पुरभाजी चोपडवाड वय 27 वर्षे रा. चालगणी ता. उमरी, 5) सुनिल दिगांबर धोटे वय 28 वर्षे रा. जारीकोट ता. धर्माबाद,** असे मयत झाले. व **1) नागेश साहेबराव कन्नेवाड वय 23 वर्षे रा. जारीकोट ता. धर्माबाद, 2) नागेश कन्नेवाड यांचा भाचा नाव माहित नाही, 3) गौरी टोपलवाड, 4) पार्वती अविनाश टोपलवाड वय 31 वर्षे 5) अनिरुध्द अविनाश टोपलवाड तिघे रा. उमरी (जहागीर) ता. भोकर,** हे गंभीर जखमी झाले आहेत. सदर अपघातास नमुद टेम्पो चालक हा कारणीभूत झाला आहे. वगैरे **फिर्यादी अविनाश संतोबा टोपलवाड वय 32 वर्षे व्यवसाय शेती मजुरी रा. उमरी (जहागीर) ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 61/2022 कलम 279,337,338,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री आर. बी. तांबोळी, मो.क्र. 9987072328** हे करीत आहेत. सदर गुन्हा हा एमएलसी प्राप्त झाले वरुन दाखल करण्यात आला आहे.

# 7)जुगार :—

**1)बिलोली :—** दिनांक 22.02.2022 रोजी चे 14.45 वा. चे सुमारास, **तळयाचे कटयाचे बाजुला असलेल्या टिनपत्राचे शेडमध्ये,बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1520/—रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्रीमती रुपाली गौतम कांबळे ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 45/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2542 सोनकांबळे, मो.क्र. 9822172300** हे करीत आहेत.

**2)कंधार :—** दिनांक 22.02.2022 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **गांधी चौक पाकीजा पान टपरी कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1620/—रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री दत्तात्रय नरहरी काळे ने. स्थागुशा,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 52/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य, मो.क्र. 9421761652** हे करीत आहेत.

**3)लोहा :–** दिनांक 22.02.2022 रोजी चे 12.40 वा. चे सुमारास, **बैल बाजार आठवडी बाजारात बिरोबा मंदिराचे मागे लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या स्ट्रायकर गुडगुडी नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 1200/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोका/3079 कैलास तुळशीराम गिरे ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 46/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1754 सुर्यवंशी, मो.क्र. 9923030407** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 79 / 2022 दिनांक : 23.02.2022**

## पोलीस अधिक्षक कार्यालयात "संत गाडगेबाबा " यांची जयंती साजरी

23 फेब्रुवारी, 2022 रोजी बुधवार "**संत गाडगेबाबा**" यांची जयंती साजरी करण्यात आली **मा. श्री प्रमोदकुमार शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्री विजय कबाडे**, अपर पोलीस अधिक्षक, भोकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले आहे. तसेच **मा. श्रीमती अर्चना पाटील,** पोलीस उप–अधिक्षक (मुख्यालय), **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, **श्रीमती शिंदे**, सपोनि, **श्री प्रदिप अल्लापुरकर**, पोउपनि पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड **इतर** शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन सपोउपनि उत्तम वाघमारे, सुर्यभान कागणे, पोना संजय सांगवीकर, पोकॉ आकाश बारोळे, पोकॉ विनोद भंडारे यांनी परिश्रम घेतले.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


कोणी न करी कोणाची ।
देहाची शुद्धी कोणा ।।
अधीक्षक कार्यालय, नांदेड
उद्घाटन समारंभ
अध्यक्ष
मा.ना.श्री जयंत पाटील
गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई